पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम - 444505
दुरध्वनी क्रमांक : 07252-232134
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

## जिल्हास्तरीय शांतता समिती बैठक

**दि. 15.11.2021**

त्रिपुरा राज्यातील तथाकथीत घटनेच्या निषेधार्थ राज्यातील विविध भागात आयोजीत आंदोलना दरम्यान घडलेल्या हिंसक घटनेच्या अनुषंगाने वाशिम जिल्हा घटकामध्ये शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्याचे दृष्टीने दि.15.11.2021 रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम येथे मा. पोलीस अधिक्षक श्री बच्चनसिंह यांचे मार्गदर्शनात जिल्हा स्तरीय शांतता समितीची बैठक आयोजीत करण्यात आली. सदर बैठकीमध्ये वाशिम नगर परिषदेचे अध्यक्ष श्री अशोक हेडा, माजी आमदार श्री राजगुरू, मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष श्री माधवराव अंभोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री केडगे तसेच जिल्हयातील प्रमुख मौलवी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व शांतता समितीचे सदस्य असे एकुण 122 सदस्य उपस्थीत होते. त्यामध्ये वाशिम तालुका-38, रिसोड तालुका-11, मालेगांव तालुका-21, मंगरूळपीर तालुका-22, कारंजा तालुका-21 व मानोरा तालुक्यातील 09 सदस्य बैठकीस उपस्थीत होते. बैठकीमध्ये नगराध्यक्ष वाशिम श्री अशोक हेडा, श्री अन्सार मौलाना मंगरूळपीर, श्री सुनिल मालपानी मंगरूळपीर, मालेगांव येथील श्री जिया अहमद, श्री अस्लम शेख शिरपुर, श्री दिपक भालेराव आसेगांव, श्री विनोद डेरे मंगरूळपीर, श्री नारायण विभुते पंचाळा, डॉ. दहातोंडे पोहा, श्री तौफिकशहा नांदखेडा, श्री शाम सवई कारंजा, श्री शे. अय्याज शेंदुरजना आढाव, श्री प्रशांत देशमुख शिरपुर, ईत्यादी सदस्यांनी आपआपले विचार व्यक्त करून जिल्हदात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. मा. पोलीस अधिक्षक श्री बच्चनसिंह यांनी दि.12.11.2021 रोजी कारंजा शहर येथे घडलेल्या घटनेतील दोषींविरूध्द कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगुन, शेजारील अमरावती व अकोला जिल्हयात नजीकचे काळात घडलेल्या हिंसक घटनाच्या प्रतिक्रीया वाशिम जिल्हयात उमटणार नाहीत या दृष्टीने सर्व समाजातील लोकांनी पुढे येऊन प्रयत्न करावे. सामाजिक माध्यमांव्दारे प्रसारीत होणाऱ्या आक्षेपार्ह चित्रफितीचे प्रसारण होणार नाही याची सर्वांनी खबरदारी घ्यावी. कोणतीही संशयीत हालचाल अथवा घटना निदर्शनास आल्यास तात्काळ पोलीसांना माहीती कळवावी असे बैठकीचे माध्यमातुन आवाहन केले.

वाशिम जिल्हा विदर्भातील हिंदु-मुस्लीम जाती धर्माचे लोकसंख्येचे प्रमाणात तुल्यबळ असलेला जिल्हा असल्याने वाशिम जिल्हा हा संवेदनशील जिल्हयामध्ये मोडला जातो. सद्यस्थीती पाहता जिल्हयातील जातीय सलोखा राखणे अत्यंत महत्वाचे आहे. देशातील व महाराष्ट्रातील काही भागात घडलेल्या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने धार्मिक भावना भडकविणाऱ्या काही आक्षेपार्ह पोस्ट, खोट्या बातम्या प्रसारीत करणारे ऑडीओ/व्हिडीओ संदेश सोशल मिडीयावर व्हायरल होत आहेत. अशा प्रकारच्या पोस्ट, व्हिडीओ फॉरवर्ड करू नये. तरीही असे आढळुन आल्यास संबंधीतांवर माहीती तंत्रज्ञान अधिनियम 2000 अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

नागरीकांनी अशा कोणत्याही अफवा, अपमाहीती, अपप्रचार यावर विश्वास ठेऊ नये. अशा प्रसंगी वाशिम जिल्हयातील तरूणांना मार्गदर्शन करून त्यांना कोणत्याही हिंसाचार, तोडफोड, जाळपोळ व कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्था भंग करण्याचे कृत्यापासुन परावृत्त करावे. तरीही त्यांचेकडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवल्यास त्यांचेवर गुन्हे दाखल करण्यात येतील व गुन्हे दाखल झाल्यास यापुढे त्यांना शासकीय नोकरीत, चारित्र प्रमाणपत्र व पासपोर्ट यांचेपासुन वंचीत रहावे लागेल. कोणतेही भडकावु कृत्य, हिंसा, तेढ निर्माण होत असल्यास किंवा गैरकायदेशीर लोकसमुह, गट तयार होत असल्यास नागरीकांच्या सुरक्षीततेसाठी व संरक्षणासाठी पोलीस प्रशासनाला तत्पर माहीती द्यावी. सद्यस्थीतीत जिल्हयात कुठेही तणाव सदृष्य परिस्थीती नसल्याने सर्व नागरीकांनी भयभीत न होता दैनंदिन व्यवहार पार पाडावेत. वाशिम जिल्हा पोलीस दल हे पुर्णपणे हत्यारानिशी व उच्च मानसिकतेचे प्रेरणेने सज्ज असुन कोणताही अनुचित प्रकार घडल्यास अत्यंत कठोर कायदेशीर कार्यवाही वाशिम जिल्हा पोलीस दलाचे वतीने करण्यात येईल.

जनसामान्याचे मनात सुरक्षीततेची भावना निर्माण व्हावी या करीता प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर शांतता समितीच्या बैठका घेण्यात आल्यात तसेच पोलीस स्टेशन हद्दीत पथसंचलन, दंगल काबु योजनेची रंगीत तालीम चे आयोजन करण्यात आले. महत्वाचे ठिकाणी फिक्स पॉईंट व सतत गस्त नेमण्यात आली आहे. जिल्हयातील नागरीकांनी कोणत्याही अफवेवर विश्वास न ठेवता शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीसांना स्वयंस्फुर्तीने सहकार्य करावे असे मा. पोलीस अधिक्षक यांचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

[signature] 15/1/24

[डी.सी. खंडेराव]
पोलीस निरीक्षक, जिविशा
पोलीस अधिक्षक, वाशिम करीता